# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### दादर (मुंबई) येथील आर.के.बिल्डिंग क्र.१/२ चे पुनर्विकासाचे काम काही वर्षापासून बंद असल्याबाबत

**(१) ८८४२२ (०४-०९-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील आर.के. बिल्डिंग क्र.१/२ गोखले रोड येथील पुनर्विकासाचे काम विकासक श्री.विलास गावंकर यांनी सन २००९ पासून सुरु केले होते परंतु सदर इमारतीचे पुनर्विकासाचे काम काही वर्षापासून बंद असल्याच्या तक्रारी अधिकाऱ्यांकडे रहिवाश्यांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाकडून भाडेकरू/रहिवाश्यांना पर्यायी जागा देऊन इमारत रिकामी करून घेण्यात आली होती परंतु गत ४ ते ५ वर्षापासून पर्यायी जागेसाठी देण्यात येणारे भाडेही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून व तदनुसार विकासकाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत म्हाडाने अर्धवट/रखडलेल्या अवस्थेत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरू/ रहिवाशी व विकासक/ ना-हरकत प्रमाणपत्रधारक यांची प्रकल्प सुरू होण्याच्या दृष्टीने संयुक्त बैठक घेऊन समस्या जाणून घेतलेल्या आहेत. त्यानुसार अर्धवट/ रखडलेल्या अवस्थेत सोडलेले प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत पावसाळयापूर्वी करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणाबाबत**

**(२) ९०१३६ (०४-०९-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळयात जीर्ण झालेल्या इमारती कोसळण्याच्या आणि त्यामुळे जीवितहानी होण्याच्या दुर्घटना टाळण्यासाठी म्हाडाकडून मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींचे सर्व्हेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात नऊ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नऊ इमारती कोणत्या आहेत तसेच या जीर्ण व धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) अ) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सन २०१७ च्या पावसाळापूर्व सर्व्हेक्षणात ज्या ९ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत:-

१. इमारत क्र. १४४ एम जी रोड (एस्प्लेनेड मेंशन) अ-११६३
२. इमारत क्र.४४-४६ काझी स्ट्रिट/९०-९४-१०२,मस्जीद स्ट्रिट,
३. इमारत क्र.१०१-१११, बारा इमाम रोड,
४. इमारत क्र.१७४-१९०, १२५-१३३, के.एम.शर्मा मार्ग, मुंबई-०२, (गोपाळ निवास),
५. इमारत क्र.३०-३२,२ री सुतारगल्ली,
६. ३९, चौपाटी सी फेस
७. इमारत क्र.२०८-२२०, काझी सय्यद स्ट्रीट
८. इमारत क्र.५५-५७, नागदेवी क्रास लेन
९. ४६-५०, लकी मेंशन, क्लेअर रोड, भायखळा

वरील नऊ धोकादायक इमारतीतील २४७ (निवासी) + २५३ (अनिवासी) = असे एकुण ५०० भाडेकरू / रहिवाशांपैकी ४५ भाडेकरू / रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच १४५ भाडेकरू / रहिवाशांनी त्यांची पर्यायी व्यवस्था स्वत:च केली आहे. सदर अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आलेल्या असून त्यांचे गाळे खाली करून घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

या धोकादायक नऊ इमारतींच्या धोकादायक भागांना टेकु लावणे, धोकादायक भाग पाडणे, इ. कार्यवाही करण्यात आली असुन आवश्यकतेनुसार इमारतींच्या दुरूस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच नऊ धोकादायक इमारतींपैकी ४ इमारती पूर्णत: रिक्त करून घेतल्या आहेत.

(ब) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सन २०१८ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात खालील ७ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आलेल्या आहेत :-

१. इमारत क्र. १४४ एम जी रोड (एस्प्लेनेड मेंशन) अ-११६३

२. इमारत क्र.२०८-२२० काझी सय्यद स्ट्रिट,

३. इमारत क्र.१०१-१११, बारा इमाम रोड,

४. इमारत क्र.३०-३२,२ री सुतारगल्ली,

५. इमारत क्रं. ६९-८१, खेतवाडी, ३ री गल्ली, गणेश भुवन

६. ३९, चौपाटी सी फेस

७. ४६-५०, लकी मेंशन, क्लेअर रोड, भायखळा

वरील सात धोकादायक इमारतीमध्ये मागील वर्षी अतिधोकादायक जाहीर केलेल्या ६ इमारतींचा समावेश आहे. या अतिधोकादायक इमारतींमध्ये २१४ (निवासी) + १८९ (अनिवासी) = असे एकुण ४०३ भाडेकरू / रहिवाशी आहेत. या इमारतींपैकी १ इमारतीस पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. १११ भाडेकरू / रहिवाशांनी त्यांची इतरत्र पर्यायी व्यवस्था स्वत:च केली आहे. आतापर्यंत २ भाडेकरू / रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात येतील व त्यांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत इचलकरंजी, वडगांव येथील तांत्रिक कक्षासाठी नियुक्त केलेल्या पदांना मंजुरी न दिल्यामुळे सदरील कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत राहिल्याबाबत

**(३) ९०९२५ (०१-०९-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत इचलकरंजी, वडगांव येथील तांत्रिक कक्षासाठी नियुक्त केलेल्या पदांना मंजुरी न दिल्यामुळे सदरील कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदांना तांत्रिक मान्यता देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१७-१८ साठीच्या शहरस्तरीय तांत्रिक कक्ष स्थापनेच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी अप्राप्त असल्याने केंद्र शासनाकडून राज्यास निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.विधानसभा सदस्य यांच्या विनंतीनुसार प्रस्तुत प्रकरणी उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडून दि. ७.८.२०१७ च्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी सुधारीत अहवाल सादर करण्यास दि.७.७.२०१८ च्या पत्रान्वये उपाध्यक्ष,म्हाडा यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील दिघा इलठणपाडा येथील १५० वर्षापूर्वीच्या ब्रिटीशकालीन धरणाची देखभाल व दुरुस्तीअभावी झालेली दुरवस्था

**(४) ९५७१३ (२६-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील दिघा इलठणपाडा येथील १५० वर्षापूर्वीच्या ब्रिटीशकालीन धरणाची देखभाल व दुरुस्तीअभावी दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणाची दुरुस्ती न केल्यास धरण फुटून परिसरातील वसाहतीला केव्हाही धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाची दुरुस्ती व धरण नवी मुंबई महानगरपालिका वा शासनाकडे हस्तांतरित करून मिळावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला असून धरण हस्तांतरित करण्याबाबत माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांना निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धरणापासून उद्भवणारा धोका व धरण हस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१८) :** (१) व (२) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिघा परिसरात जुना इलठणपाडा क्षेत्रात रेल्वे प्रशासनाच्या मालकीचा ब्रिटिशकालीन धरण आहे.

• सदर धरणाची दुरूस्ती रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात येते.

• सदर धरणाच्या भिंतीला तडे गेले असल्याने त्याची दुरूस्ती करण्यासाठी महानगरपालिकेने रेल्वे प्रशासनाला कळविले आहे.

(३) व (४) • सदर धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत रेल्वे प्रशासनाकडे वेळोवळी मा.लोकप्रतिनिधी तसेच महानगरपालिकेने मागणी केलेली आहे.

• General Manager (Central Railway) यांनी दि. २१.०७.२०११ रोजीच्या पत्रान्वये धरण व आजूबाजूचा परिसर पर्यटन विकासासाठी रेल्वेला आवश्यक असून, त्याबाबतचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठविला असल्याने उक्त धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे शक्य होणार नसल्याचे कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रशासन रस्ते दुरुस्ती करण्यास अपयशी ठरले असल्याबाबत

**(५) १०६४०२ (१९-०४-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास अपयशी ठरले असून त्यामुळे अपघातात वाढ झाली आहे म्हणून येथील खराब रस्त्यांची दखल घेवून शासनाने उक्त प्रकरणी स्वत: लक्ष घालावे अशी सूचना मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनाला केली असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत खड्डयांबाबत २३९ तक्रारीपैकी १५७ तक्रारींचा आणि मुंबई वगळता राज्यभरातून ५५५ तक्रारींपैकी फक्त ७७ तक्रारींचा पाठपुरावा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रस्ते दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.७१/२००१३ संदर्भात पारित केलेल्या दि. २०.५.२०१५ रोजी पारित आदेशाच्या अनुषंगाने रस्ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी संबधित महानगरपालिकांची राहील अशा सूचना दि.९.७.२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २४.०२.२०१८ व १२.०४.२०१८ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने दिनांक १८.०८.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना सूचना दिलेल्या आहेत.

(२) व (३) • रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती ही निरंतर प्रक्रिया असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी रस्ते सुस्थितीत ठेवण्याबाबत कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

• महानगरपालिकांकडून मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने रस्त्याच्या देखभालीकरीता कार्यवाही करण्यात येते.

• सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ३०.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

• रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत तक्रारी दाखल करण्यासाठी व त्याबाबत माहिती प्राप्त करण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सुचना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना दिनांक ०९ जूलै, २०१५, ०४ ऑगस्ट, २०१५ व १८ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर निधीपेक्षा जास्त पटीने विकास कामांना मंजुरी दिल्याबाबत**

**(६) १०८२१४ (१४-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषदेने गत दहा महिन्याच्या कालावधीमध्ये एक हजार पेक्षा जास्त विकासकामांना मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद नगरपरिषदेमार्फत मंजुर निधी व त्यांच्याकडे कर स्वरुपात जमा असलेल्या निधीपेक्षा किती पटीने जास्त निधीची कामे मंजूर करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, सदरहू मंजूर केलेली विकास कामांची निविदा काढण्यासाठी शासनाचे निकष काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू निकषाप्रमाणेच विकास कामांच्या निविदा उस्मानाबाद नगरपरिषदेतर्फे काढण्यात आले आहेत काय,

(५) असल्यास, कामांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांना लेखी पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) दि.०१ जून, २०१७ ते दि.३१ मार्च, २०१८ या दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये एकूण ७८२ विकास कामांच्या ठरावांना मंजूरी दिल्याचे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(२) उस्मानाबाद नगरपरिषदेमार्फत मंजूर उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामांना प्राधिकरणाची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेऊन कामे करण्यात येत आहेत.
(३) व (४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९३ मधील तरतूदी, तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचना व नियमांस अनुसरुन विकास कामांची निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(५) व (६) होय. याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून संचालनालयाच्या दि.१८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला असल्याचे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अहवालात नमूद केले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांसाठी १० हजार ४९६ घरे उपलब्ध होणार असल्याबाबत**

**(७) ११०४६६ (०३-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांसाठी १० हजार ४९६ घरे उपलब्ध होणार असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही घरे उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया केव्हापासून सुरु करण्यात येणार वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
पुणे महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ८ प्रकल्पांतर्गत एकूण ६२६४ घरकुलांची निर्मिती करण्यात येणार आहे.
(२) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांची निर्मिती करण्याच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतर्फे निविदा काढण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर घरांचे बांधकाम करण्याबाबतची प्रक्रिया सुरु होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपुर) येथील घनकचरा प्रकल्पाचे बांधकाम तात्काळ पुर्ण करणेबाबत**

**(८) ११०५७१ (१८-०४-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्र.४ येथे सन २०१५-१६ मध्ये घनकचरा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प अद्यापही पुर्ण झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने उक्त घनकचरा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८)** : (१), (२), (३) व (४) • राजूरा नगरपरिषदेअंतर्गत घनकचरा प्रकल्प सन २००६-०७ पासून सुरु करण्यात आला असून त्या ठिकाणी निधीच्या उपलब्धतेनुसार विविध कामे करण्यात येत आहेत.
• त्यानुसार नगरपरिषदेने सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात १४ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रकल्पाच्या जागेवर संरक्षण भिंत बांधण्याचे रुपये ५३.६३ लक्ष चे काम तसेच खताकरीता कंपोष्ट टाके व शौचालय बांधकामाचे रुपये ७५.६९ लक्ष चे काम यांना दिनांक २५/५/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांची प्रशासकीय मान्यता घेऊन तसेच याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबवून सदर कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राळेगांव (ता.राळेगांव) नगरपंचायत यांचेकडे स्वमालकीची जागा नसल्यामुळे नगरातील विकास कामांना अडथळा येत असल्याबाबत**

**(९) ११०७१२ (१९-०४-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगांव (जि.यवतमाळ) येथील नगरपंचायत दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी अस्तित्वात आली परंतु नगरपंचायतच्या नावे येथील सर्व्हे नं च्या सातबारे उताऱ्यावर जमीनी मालक म्हणून शासन असा उल्लेख आहे, परंतु सातबाऱ्यावर नगरपंचायत मालकीची नोंद नसल्याने विकास कामास अडथळा येत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राळेगांव नगरपंचायतीचे जमीनीच्या सातबारावर मालकीची नोंद करण्यात येवून विकास कामांना झालेला अडथळा दूर करण्यात येईल काय,
(३) असल्यास, किती दिवसापर्यंत मालकी हक्काची नोंद करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८)** : (१), (२) व (३) • राळेगाव नगरपंचायतीची स्थापना दिनांक ८/४/२०१५ रोजी झाली आहे.
• त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा.५) यांच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा उप खंड (सहा) अन्वये सदर स्थानिक प्राधिकरणाची संबंधीत सर्व मत्ता, हक्क आणि दायित्वे उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरणाकडे

म्हणजेच राळेगाव नगर पंचायतीकडे हस्तांतरीत होणे अपेक्षित आहे. त्यानुसार राळेगाव महसूली क्षेत्रातील नगरपंचायतीची मालकी असलेल्या जमिनीच्या नोंदी अद्याप नगरपंचायतीच्या नावे झाली नसल्याची व त्यामुळे विकास कामांना अडथळा येत असल्याची बाब मुख्याधिकारी यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

• शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाने त्यांच्याकडील दिनांक २२/१२/२०१५ च्या आदेशान्वये तत्कालिन ग्रामपंचायतीची सर्व मत्ता, हक्क व दायित्वे राळेगाव नगर पंचायतीकडे हस्तांतरीत झाल्याचे आदेश पारित केले आहेत.

• सदर आदेश विचारात घेऊन, तत्कालिन ग्रामपंचायतीच्या मालकीच्या सर्व जमिनीच्या नोंदी सुधारित करुन त्या नगरपंचायत राळेगाव यांच्या नावे करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम नगरपरिषद रस्ता विकास निधी अंतर्गत करण्यात आलेल्या रस्ता डांबरीकरणाचे देयके गत ३ वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ११०७६६ (१८-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम नगरपरिषद रस्ता विकास निधी अंतर्गत करण्यात आलेल्या रस्ता डांबरीकरणाचे रुपये २९ लाख ३८ हजाराचे देयके गत ३ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या कामाचे कंत्राटदार आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर प्रलंबित देयके तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) असे कोणतेही देयक नगरपरिषदेकडे प्रलंबित नसल्याचे जिल्हाधिकारी, वाशिम यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घुग्गूस (जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देणेबाबत**

**(११) ११०८३९ (१८-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) तालूक्यातील ५५ हजार लोकसंख्या असलेल्या घुग्गूस ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत ग्रामपंचायतीसह लोकप्रतिनिधींनी आणि नागरिकांनी शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घुग्गूस ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५५ हजार असून मतदारांची संख्या ३५ हजार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ५५ हजार लोककसंख्या असलेल्या घुग्गूस ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) घुग्गूस ग्रामपंचायतीची सन २०११ च्या जनगणनेसार ३२७२६ इतकी लोकसंख्या आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या यादीनुसार तेथील मतदारांची एकूण संख्या ३१३४४ इतकी आहे.
(३) • शासनाने यापूर्वी दिनांक १/६/१९९९ च्या आदेशान्वये घुग्गूस, नाकोडा, म्हातारदेवी आणि चांदूर या ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेले स्थानिक क्षेत्र नगरपालिका म्हणून घोषित करण्यासाठी उद्घोषणा निर्गमित केली होती.
• दरम्यान जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने सदरची नगरपालिका करण्यास विरोध दर्शविल्याने ग्राम विकास विभागाने सदर प्रस्ताव नामंजूर केला.
• त्यानंतर घुग्गूस ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर करण्याची विनंती सन २०१२ मध्ये विचारात घेण्यात आली. तथापि, यासंदर्भात प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करुन ५ वर्षाचा कालावधी उलटून गेला असल्याने नव्याने उद्घोषणा प्रसिद्ध करणे आवश्यक होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतूदी विचारात घेऊन शासनास प्रस्ताव सादर करण्याचे दिनांक २१/४/२०१५, दिनांक २८/१०/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि, अद्याप त्यांचेकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील पंढरपूर शहराचा केंद्र शासनाच्या हृदय योजनेत हेरिटेज सिटी (ऐतिहासिक शहर) करण्यासाठी प्रस्ताव सादर केला असल्याबाबत**

**(१२) ११०८९९ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील पंढरपूर शहराचा केंद्र शासनाच्या हृदय योजनेत हेरिटेज सिटी (ऐतिहासिक शहर) करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमध्ये पंढरपूर शहरातील जुन्या ऐतिहासिक इमारती अथवा ठिकाणांचा शोध करून त्यांचे समर्थन, जतन करून विकास होणार असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना पंढरपूर येथे तातडीने राबविणेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) व (२) "हृदय योजना" केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने निवडलेल्या शहरात मंगळवेढा अथवा पंढरपूर शहराचा समावेश करण्यात आलेला नाही. या शहरांचा असा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तीर्थक्षेत्र पंढरपूरचा विकास करण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या नमामि चंद्रभागा योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) १११००१ (१८-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या नमामि चंद्रभागा योजनेतील कामे गत २ वर्षापासून प्रलंबित असून तांत्रिक मंजुरी अभावी योजनेतील बरीचशी कामे अद्यापही सुरु न झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत तुलासीवन, नामसंकीर्तन सभागृह, नदी शुद्धीकरण, नदी पात्रात स्वच्छ व निर्मल पाणी यासारख्या अनेक योजना अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे केवळ कागदावरच राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार विलंब करण्याऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) नमामि चंद्रभागा अभियानांतर्गत पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील यमाई तलावा नजीकची १ हेक्टर जागेवर वन विभागामार्फत तुलसीवनाची निर्मिती करण्यात येणार आहे.
• महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्रमांक निसप-२०१७/प्र.क्र.९२/फ-५, दिनांक ८/६/२०१७ अन्वये निसर्ग पर्यटन / वन पर्यटन स्थळाचा विकास या योजनेंतर्गत सन २०१७-१८ साठी नमामि चंद्रभागा अंतर्गत यशवंतराव चव्हाण यमाई तलाव परिसर पंढरपूर तुळशी वृंदावन उद्यान निर्मितीकरीता रुपये ३२९ लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे.
• नामसंकिर्तन सभागृह बांधकामाच्या अंदाजपत्रकानुसार पहिल्या टप्यासाठी रुपये २१.२४ कोटीच्या इमारत बांधकामास जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २३/३/२०१७ रोजी मंजूरी दिली आहे. यासाठी रुपये १० कोटी ही विशेष तरतूद सन २०१६-१७ मध्ये नगरपरिषदेकडे देण्यात आली असून सभागृह बांधकामासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

• नदी शुद्धीकरण करण्यासाठी भुयारी गटारी योजना टप्पा क्र.३ ला दिनांक ७/२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार योजनेमध्ये एकूण ६६.१३ कि.मी. मलनि:सारण वाहिनी प्रस्तावित आहे. त्याबाबतचे कार्यादेश दिनांक ११/४/२०१८ रोजी देण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर (जि.जळगांव) नगरपरिषदेस राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत ताडेपुरा तलावाच्या संवर्धनाच्या प्रस्तावास मंजूरी दिल्याबाबत**

**(१४) ११३२६९ (०३-०४-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) नगरपरिषदेस राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत ताडेपुरा तलावाच्या संवर्धनाच्या प्रस्तावास शासन आदेश दिनांक १२ जानेवारी, २०१७ अन्वये मंजुरी देवून एकूण मंजूर निधीपैकी रु.५० लक्ष इतका निधी धनादेशाव्दारे वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन आदेशातील प्रपत्र-अ मधील नमूद कामांना तांत्रिक मंजूरीकरीता नगरपरिषदेने शासनाकडे प्रस्ताव (मंजूर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्रे) सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन आदेशाच्या/धनादेशाच्या दिनांकापासून २४ महिन्यात किंवा तत्पूर्वी काम पूर्ण करण्याचे शासन आदेश असून १२ महिने उलटून गेले तरी कामाची सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाहीस होणा-या विलंबाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत ताडेपुरा तलावाच्या संवर्धनासाठी आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत दि.०२.०९.२०१५ रोजी श्री. चेतन सोनार, आर्किटेक्ट, अमळनेर यांना आदेश दिले आहेत. सदर प्रस्ताव आर्किटेक्ट यांनी सादर केलेला नसल्यामुळे दि.२५.०६.२०१८ रोजी त्यांना नोटिस बजावण्यात आली आहे.

• दि.१२.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर काम पुर्ण करण्याकरीता २४ महिन्याची मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार सदर काम विहित मुदतीत पुर्ण करण्यााबाबत कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हाधिकारी, जळगाव यांनी अहवालात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगुरुनगर नगरपरिषद (ता.खेड, जि.पुणे) येथील नमामि चंद्रभागा योजनेंतर्गत भीमा नदी संवर्धन प्रकल्प अहवालास (P.F.R) प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(१५) ११४२२२ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर नगरपरिषद (ता.खेड, जि.पुणे) येथील नमामि चंद्रभागा योजनेंतर्गत भीमा नदी संवर्धन प्रकल्प अहवाल (P.F.R) प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत राजगुरुनगर नगरपरिषदेने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) व (२) • राजगुरुनगर नगरपरिषदेमार्फत नमामि चंद्रभागा अभियानाच्या प्रकल्प अहवालाचा पूर्व व्यवहार्यता अहवाल तयार करण्यात आला असून तो विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे सादर केला आहे.

• राजगुरुनगर शहराच्या भुयारी गटारी योजनेचा प्रकल्प अहवाल खाजगी संस्थेमार्फत तयार करुन घेण्यात आला असून मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे दिनांक २८/६/२०१७ च्या आदेशानुसार रुपये ३१.४० कोटींच्या भुयारी गटार योजनेस तांत्रिक मान्यता मिळालेली आहे.

• सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमांतर्गत आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. या योजनेमध्ये ४५ कि.मी. लांबीची मलनि:सारण वाहिनी व ६.७ MLD क्षमतेचे मलनि:सारण केंद्र आणि इतर तांत्रिक बाबींचा समावेश आहे.

• शहरातील घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या अभियानांतर्गत राज्य शासनाने नोंदणीकृत केलेल्या खाजगी संस्थेमार्फत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल रुपये २ कोटी करुन घेण्यात आलेला असून तो तांत्रिक मान्यतेस्तव मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोताळा व संग्रामपूर (जि.बुलडाणा) नगरपंचायतीसाठी कर्मचारी वर्ग दिला नसल्याबाबत**

**(१६) ११५३०४ (०३-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा व संग्रामपूर (जि.बुलडाणा) नगरपंचायत निर्माण होवून सुमारे अडीच वर्षे पुर्ण होऊनसुध्दा नगरपंचायतीसाठी कर्मचारी वर्ग दिला नसल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपंचायतींमध्ये अपु-या कर्मचारी वर्गामुळे मोताळा व संग्रामपूर नगर पंचायत हद्दीतील नागरीकांना मोठया प्रमाणात सुविधांचा अभाव भासत असून विकास कामांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार मोताळा व संग्रामपूर (जि.बुलडाणा) या नगरपंचायतींना कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१), (२) व (३) • नगर विकास विभागाने दिनांक ५ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतीसाठी आकृतीबंध मंजूर केलेला आहे.

• मोताळा नगरपंचायती करीता मंजूर आकृती बंधानुसार राज्यस्तरीय संवर्गातील पदांव्यतिरिक्तच्या २० पदांपैकी ०७ पदे भरण्यात आली असून त्यापैकी एक पद कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झाले असून एकूण १४ पदे रिक्त आहेत. तसेच राज्यसंवर्गातील ९ पदे देखील रिक्त आहेत.

• संग्रामपूर नगरपंचायती करीता मंजूर आकृती बंधानुसार राज्यस्तरीय संवर्गातील पदांव्यतिरिक्तच्या १३ पदांपैकी ३ पदे भरण्यात आली असून १० पदे रिक्त आहेत. तसेच राज्यसंवर्गातील ७ पदे देखील रिक्त आहेत.

• शासनाने राज्यातील नगरपरिषदांमधील राज्यस्तरीय संवर्गातील पदांचा सुधारित आकृतीबंध दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केला आहे. तसेच भरतीचे सुधारीत सेवा नियम दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी मंजूर केले आहेत.

• राज्यात राज्यसंवर्गातील एकूण मंजूर पदांपैकी पदोन्नतीची १००९ पदे व सरळसेवेची २७६३ पदे रिक्त आहेत.

• नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च, २०१७ अन्वये अग्निशमन संवर्ग वगळता उर्वरित पदे भरण्याकरीता मान्यता देण्यात आली आहे.

• त्यानुसार सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी १८८९ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून दिनांक १८ ते २३ मे, २०१८ च्या दरम्यान पूर्व परिक्षा घेण्यात आली आहे. सदर पदभरतीची कार्यवाही ही माहे सप्टेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

• पदभरतीअंती नगरपरिषदांमध्ये राज्यसंवर्गीय पदांवर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच मोताळा व संग्रामपूर नगर परिषदेअंतर्गत राज्य संवर्गाव्यतिरिक्त मंजूर रिक्त पदे आवश्यकतेनुसार भरण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील बोगस डॉक्टरांवर कारवाई होत नसल्याबाबत

**(१७) ११५९५७ (१२-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बोगस डॉक्टरांवर नियंत्रण करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने वैद्यकीय व्यावसायिक शोध समिती स्थापन करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसाय करणे, एका वैद्यकीय शाखेची पदवी असताना दुसऱ्या शाखेचा व्यवसाय करणे, नियमबाह्यपणे डॉक्टर ही पदवी लावणे असे बोगस डॉक्टर ठरवूनही महानगरपालिकेमार्फत कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका बोगस डॉक्टरप्रकरणी महानगरपालिकेविरोधात दावा दाखल झाल्याने कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कामात विलंब करणाऱ्या अधिकारी व संबधित बोगस डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) व (२) पुणे महानगरपालिका स्तरावर सन २०१३ साली बोगस वैद्यकीय व्यवसायिक शोध समिती स्थापना करण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात संशयीत बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिं विरुध्द तक्रार देण्याकरिता आवश्यक दूरध्वनी क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून संबंधित बोगस वैद्यकीय व्यावसायधारकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

(३) व (४) बोगस वैद्यकीय व्यावसायिक श्री.धनसिंगह चौधरी यांनी पुणे महानगरपालिकेविरुध्द दावा दाखल केला होता. पुणे महानगरपालिकेने श्री.धनसिंग चौधरी यांचेविरुध्द मा. सत्र न्यायालय पुणे येथे अपिल दाखल केले आहे.

या प्रकरणी संबंधितांना कारणेदाखवा नोटीस दिलेली असून त्याबाबत पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, महामंडळे, विविध सरकारी व निमसरकारी कंपन्यांना सुरक्षा रक्षक पुरवितांना माजी सैनिक यांना नेमणुका देणेबाबत

**(१८) ११६१२८ (१४-०४-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, महामंडळे, विविध सरकारी व निमसरकारी कंपन्यांना सुरक्षा रक्षक पुरवितांना माजी सैनिक महामंडळ मेस्को कंपनीकडून माजी सैनिक घेण्याचे शासन परिपत्रकाद्वारे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षा रक्षक पुरविणेच्या कामात माजी सैनिकांच्या नेमणुका करणे ऐवजी अन्य उमेदवारांच्या (माजी सैनिक नसलेले) नेमणुका मेस्को कंपनीकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शासन परिपत्रकानुसार सुरक्षा रक्षक म्हणून माजी सैनिक पुरविणेच्या कामात मेस्को कंपनीकडून होत असलेल्या कारभाराबाबत सदर कंपनीची चौकशी करणे व संबंधित शासन परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेकरीता आऊटसोर्सिंग कॉन्ट्रक्टर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांनी शासनाला निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१) शासन निर्णय क्रमांक मासैम १०९९/२३९०/ प्र.क्र. २४४/९९/२८, दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ व मासैनो २००५/६२२/ प्र.क्र. ११९/२८ दिनांक ११ जून, २०१० अनुसार जेव्हा जेव्हा शासकीय कार्यालये, महामंडळे, विविध सरकारी, निमसरकारी कंपन्यांना सुरक्षा रक्षकांची आवश्यकता भासेल तेव्हा त्यांनी महाराष्ट्र माजी सैनिक महामडळाकडून माजी सैनिक व त्यांचे सुरक्षा प्रशिक्षित पाल्य यांचीच सुरक्षा रक्षक म्हणून विना - निविदा मागणी करण्यात यावी असे अधोरेखीत आहे.

(२) फक्त ज्या ठिकाणी माजी सैनिक किंवा त्यांचे पाल्य अपेक्षित संख्येमध्ये उपलब्ध होत नाहीत, त्याठिकाणी मुख्य नियोक्त्याच्या समंतीने सिव्हीलीयन घेतले जातात व तेही या अटीवर की जेव्हा माजी सैनिक उपलब्ध होतील तेव्हा सिव्हीलीयनला कमी करुन माजी सैनिक/ पाल्यांची नेमणुक करण्यात येईल, तसे त्यांच्याकडून लेखी स्वरुपात लिहून घेतले जाते.

(३) असे कोणत्याही प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषदेमधील पदोन्न्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) ११६२३१ (१२-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषदेमधील पदोन्न्ती देण्यामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतची याचिका मा.राज्यमंत्री नगरविकास यांच्याकडे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दाखल झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये सन १९८० मध्ये नगरपरिषदेमध्ये अस्तित्वात नसलेल्या पदावर पदोन्नती देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ३२० नुसार निर्णय देण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना आहेत काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ३१८ ने फेटाळलेल्या प्रकरणातच कलम ३२० ने तत्कालीन मा.विभागीय आयुक्तांनी निर्णय दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) यासंदर्भात याचिका/तक्रार/निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ३२० नुसार निर्णय देण्याचा अधिकार संचालक तथा जिल्हाधिकारी यांना आहेत.
(४) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ३१८ अन्वये दाखल केलेला पुनरिक्षण अर्ज अपर आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांच्या दि.०७.०९.२०१३ च्या आदेशान्वये फेटाळला आहे. सदर आदेशाविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ३२० अन्वये दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जावरही अपर आयुक्त, औरंगाबाद यांनीच दि.२१.०१.२०१४ रोजी आदेश दिले आहेत.
(५) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३२० अन्वये दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जावरील कार्यवाहीसंदर्भातील बाब तपासण्याबाबत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नगरपरिषदेंतर्गत मामा तलावाचे संवर्धन करण्याबाबत

**(२०) ११६३४८ (११-०४-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नगरपरिषदेंतर्गत मामा तलावाचे संवर्धन करण्यासाठी काढण्यात आलेली नीयमबाह्य निवीदा प्रकरणी चौकशी करून अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमबाह्य निविदा प्रकरणी शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१), (२) व (३) यासंदर्भात राजूरा नगरपरिषदेने मालगुजारी तलावातील गाळ काढण्याच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ५ निविदाधारक सहभागी झाले. त्यातील १ निविदाधारकांनी धनाकर्ष निविदेसोबत सादर केला नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले. उर्वरित २ निविदाकार पात्र ठरले आणि २ निविदाकाराची राष्ट्रीयकृत बँकेची धनाकर्ष नसल्याने सर्वसाधारण सभेने त्या अपात्र ठरविल्या. दरम्यान निविदेत स्पर्धा होण्यासाठी सदरच्या अपात्र ठरविलेल्या २ निविदाकाराचे धनाकर्ष राष्ट्रीयकृत बँकेची नसले तरी इतर बँकाचे धनाकर्ष स्विकारण्यास सभेने मंजूरी दिली. त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

यासंदर्भात अनियमितता झाली किंवा कसे? याबाबत उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समितीने चौकशी केली असून सदर चौकशीत विषयांकित कामाची निविदा प्रक्रिया नियमबाह्य असल्याचे आढळून आले नाही, असे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी जून, २०१५ मध्ये शासनास कळविले आहे.

---

## नाशिक (जि.नाशिक) महानगरपालिका क्षेत्रातील जमीनी व निवासी क्षेत्रावरील अन्यायकारक करवाढ रद्द करण्याबाबत

**(२१) ११६९२४ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (जि.नाशिक) महानगरपालिका क्षेत्रातील निवासी क्षेत्र व जमिनींवरील अन्यायकारक व बेकायदेशीर करवाढीबाबत माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनांनी शासनास तसेच आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील अन्यायकारक करवाढ रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ अन्वये, महानगरपालिकेस मालमत्ता कर आकारण्याचा अधिकार आहे. अधिनियमातील कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४१३ (२) व अनुसूची ड प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ७, ७(अ), ८, २० च्या अर्थातर्गत मालमत्ता कराकरीता इमारतीचे मुल्यांकन करण्याचे व त्यांचे करयोग्य मुल्य निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त यांचे आहेत. त्यानुसार नाशिक महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१/०४/२०१८ पासूनचे करयोग्य मुल्य निश्चित करण्यात आले आहे.

सन १९९९-२००० ते दि.३१/०३/२०१८ पर्यंत सुमारे १८ वर्षांपासून मुल्यांकनाच्या दरामध्ये वाढ करण्यात आलेली नसल्याने, शिघ्रसिध्द गणकानुसार जागेचे व इमारतीच्या दरामध्ये झालेल्या वाढीचा विचार करुन, महानगरपालिकेने कराचे व मुल्यांकन दरात वाढ केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर महानगरपालिकेत एका ठेकेदाराने महानगरपालिका उपायुक्तांच्या अंगावर पैसे फेकल्याबाबत**

**(२२) ११७१६० (२८-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर महानगरपालिकेत ड्रेनेज लाईनच्या कामाची देयक प्रस्तावावर स्वाक्षऱ्या करणे प्रलंबित राहिल्याने एका ठेकेदाराने महानगरपालिका उपायुक्तांच्या अंगावर पैसे फेकल्याचे दिनांक २१ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानूसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याप्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेतील संबंधित तत्कालीन प्र.उपायुक्त यांनी तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे दिनांक २१/०५/२०१८ रोजी फिर्याद दाखल केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनधिकृत इमारतीमधील घरांच्या खरेदी व्यवहारांची नोंदणी करण्याच्या शासन निर्णयाबाबत**

**(२३) ११७२३२ (२३-०७-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनधिकृत इमारतींची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने या इमारतींच्या बांधकामासाठी आवश्यक परवानग्या न घेताच घरांची विक्री होऊन त्यात विकत घेणाऱ्या सर्वसामान्यांची फसवणूक होते ती टाळण्यासाठी अशा अनधिकृत इमारतीमधील घरांच्या खरेदीचे व्यवहार रजिस्टर करण्यात येऊ नये असा निर्णय नगरविकास विभागाने घेतला असून रजिस्टर विभागाला दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची व अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८)** : (१) व (२) गाळेधारक व सदनिकाधारकांची फसवणूक टाळण्यासाठी त्या त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत इमारतींची/बांधकामाची यादी संबंधित दुय्यम निबंधकाकडे सादर करुन, त्यांना सदर इमारतीतील सदनिकाबाबत खरेदी व्यवहार नोंदवू नयेत अशा सूचना संबंधित नियोजन प्राधिकरणानी देण्याबाबत दिनांक ०३ मे, २०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. याबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था / नियोजन प्राधिकरण स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**रेवस-करंजा आणि करंजा-रेवस जलवाहतूक मे.आर.एन.शिपिंग मार्फत वेळापत्रकानुसार नियमित चालवली जात नसल्याबाबत**

**(२४) ११७४६१ (३०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवस-करंजा आणि करंजा-रेवस जलवाहतूक मे.आर.एन.शिपिंग मार्फत वेळापत्रकानुसार नियमित चालवली जात नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, मे.बो.इंडियन मार्कंटाईल चेंबर्स, मुंबई यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१८) :** (१) होय.
रेवस-करंजा व कंरजा-रेवस प्रवासी जलवाहतुक संघ यांच्यामार्फत दिनांक १५.२.२०१८ अन्वये निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) रेवस-कंरजा आणि कंरजा-रेवस या जलमार्गावर निर्धारित वेळापत्रकानुसार प्रवासी वाहतूक करण्यात येते. तथापि, उधाणाच्या ओहोटीच्या वेळी सुमारे चार ते पाच दिवस प्रवासी वाहतुकीच्या वेळापत्रकात बदल होतो. त्यानुसार वेळापत्रकात झालेल्या बदलाबाबत कंपनीमार्फत सुचना फलकावर माहिती प्रसिध्द करण्यात येते. तसेच दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वेळापत्रकात झालेल्या बदलाबाबतची माहिती वॉटसअॅप प्रणालीद्वारे देखिल कळविण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेने ३७ शाळांचे विलीनीकरण व शहरातील १०१ अंगणवाड्या बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२५) ११८२८२ (२३-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेने ३७ शाळांचे विलीनीकरण व शहरातील १०१ अंगणवाडया बंद करण्याचे ठरविल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शाळांतील शिक्षकांचे व अंगणवाडयातील सेविका व मदतनीस यांचे समायोजन कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८)** : (१) • नाशिक महानगरपालिकेच्या १२६ शाळांमधील पटावरील विद्यार्थी, प्रत्यक्ष उपस्थिती, शिक्षक व विद्यार्थ्यांचे गुणोत्तर प्रमाण, उपलब्ध इमारती व वर्गखोल्या, दोन शाळांमधील अंतर या बाबी विचारात घेऊन, महानगरपालिकेमार्फत ३७ शाळांचे जवळच्या अथवा त्याच आवारातील शाळांमध्ये विलीनीकरण करण्यात आलेले आहे.
• तसेच, महानगरपालिकेच्या ४१२ अंगणवाड्या असून, २५ पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १३५ अंगणवाड्यांपैकी ५३ अंगणवाड्या शासनाच्या एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागाकडे व ४३ अंगणवाड्या महानगरपालिकेच्या इतर अंगणवाड्यांमध्ये विद्यार्थ्यांसह वर्ग करण्यात आल्या आहेत. तर उर्वरित ३९ अंगणवाड्या महानगरपालिकेमार्फत बंद करण्यात आल्या असून, यामधील विद्यार्थी जवळपासच्या एकात्मिक बालविकास विभागाच्या किंवा महानगरपालिकेच्या अंगणवाड्यांमध्ये वर्ग करण्यात आलेले आहेत.
(२) व (३) विलीनीकरण करण्यात आलेल्या शाळांमधील अतिरिक्त झालेल्या १२ मुख्याध्यापक व ५३ उपशिक्षकांचे सेवाज्येष्ठतेनुसार महानगरपालिका शाळांमध्ये समायोजन करण्यात आलेले आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या ऐच्छिक कार्यक्रमांतर्गत सुरु असलेल्या अंगणवाड्यांमध्ये कार्यरत असलेल्या सेविका व मदतनीस यांना तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्ती देण्यात आलेली असल्याने व ते महानगरपालिकेचे कायम कर्मचारी नसल्याने, त्यांना महानगरपालिका सेवेत समायोजित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या रूग्णालयांमधील कार्यरत सुरक्षारक्षकांना गत चार महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत

**(२६) ११८५५१ (२८-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या रूग्णालयांमधील कार्यरत सुरक्षारक्षकांना गत चार महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचा-यांना त्यांचे थकीत वेतन तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाशिक जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाकडील कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे देयक मंडळाकडून महानगरपालिकेस वेळेवर प्राप्त होत नाही.

त्यामुळे सदर सुरक्षारक्षकांना मागील चार महिन्यांत वेतन अदा करण्यास विलंब झालेला आहे. याबाबत महानगरपालिकेने दि.१४/०६/२०१८ च्या पत्रान्वये मंडळास कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महानगरपालिकांनी त्यांच्या क्षेत्रातील बेकायदा बांधकामांची यादी वेबसाईटवर व वर्तमानपत्रात विकासकांच्या नावासह प्रसिद्ध करण्याचे शासनाने दिलेले आदेश**

**(२७) ११९३३३ (२३-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महानगरपालिकांनी त्यांच्या क्षेत्रातील बेकायदा बांधकामांची यादी वेबसाईटवर व वर्तमानपत्रात विकासकांच्या नावासह प्रसिद्ध करण्याचे आदेश शासनाने दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास काढले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा बेकायदा बांधकामांची यादी महानगरपालिकेतही सब रजिस्ट्रारकडे सादर करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आदेशानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात किती अनधिकृत बांधकामे आहेत व त्यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१)व (२) हे खरे आहे.
(३) •महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६०, २६०(१), ४७८ आणि महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३(१) अन्वये कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करून सन २०१० ते ३०.०६.२०१८ या कालावधीत घोषित केलेली एकूण ३४६७ प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामे तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारण यांचेकडून नोटीस दिलेल्या एकूण २२९ अनधिकृत बांधकामे अशा एकूण ३,६९६ अनधिकृत बांधकामांची यादी महापालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

• सदर बांधकामांवर महानगरपालिकेने नियमानुसार कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

• सदर बांधकामाच्या अधिकृततेबाबत संबंधीत नियोजन प्राधिकरणाकडून अधिकृत बांधकाम परवानगी देण्यात आल्याची खातरजमा केल्याशिवाय खरेदी विक्री करण्यात येऊ नये अशा सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत.

• दि. ०३.०५२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सदर बांधकामाची/मिळकतीची खरेदी विक्री व्यवहाराची नोंदणी करण्याची दक्षता घेणेकामी सह निबंधक वर्ग-२ यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील २०३ सफाई कर्मचाऱ्यांना घनकचरा विभागात वर्ग करण्याबाबत**

**(२८) ११९३४३ (२८-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका मुख्यालय, लोकप्रतिनिधींची दालने व महानगरपालिकेच्या अन्य कार्यालयात वर्षानुवर्षे असलेल्या २०३ सफाई कर्मचाऱ्यांना पुन्हा घनकचरा विभागात वर्ग करण्याचे आदेश आयुक्तांनी दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास संबंधित विभागाला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर आदेशानुसार सुमारे १३० सफाई कर्मचारी हजर न झाल्यामुळे महानगरपालिकेला नाले सफाईसाठी कंत्राटदार नियुक्त करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे सफाई कर्मचारी कामगार त्यांच्या खात्यात हजर न होण्याची कारणे काय आहेत व त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत एकूण मंजूर २२७४ सफाई कामगारांपैकी २०५० सफाई कामगार सद्या कार्यरत आहेत.

• त्यापैकी १८६५ सफाई कामगार हे दैनंदिन कचरा सफाई व संकलनासाठी, १८२ कामगार जंतुनाशक फवारणीसाठी व २०३ सफाई कामगार इतर विभागात वसूली व बिले वाटप इत्यादी बाबतची कामे करण्यासाठी प्रशासकीय विभागात कार्यरत आहेत.

• आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी दि. ०७.०५.२०१८ च्या आदेशान्वये उक्त २०३ सफाई कामगारांच्या सेवा घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे वर्ग करून, त्यांच्या नेमणूका विविध प्रभाग कार्यालयात सफाई कामासाठी करण्यात आल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • सन-१९९७ पासून सफाई कर्मचाऱ्यांची महानगरपालिकेत भरती न झाल्याने, पदे रिक्त आहेत व प्रशाकसीय विभागातील सफाई कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केल्यास, त्याचा परिणाम कर वसूली व कार्यालयीन कामकाजावर होणार आहे, असे प्रत्येक विभाग प्रमुख व प्रभाग क्षेत्र अधिकारी यांनी कळविले आहे.

• त्यामुळे, पावसाळ्यापूर्वी साफसफाईची कामे करणे आवश्यक असल्याने, प्रभागातील नाले सफाई कामासाठी १२२ प्रभागामध्ये ५०० कामगार मंजूर निविदा दराने खाजगी ठेकेदाराकडून उपलब्ध करून गटार सफाईचे काम करून घेतले जात आहे.

• घनकचरा व्यवस्थापन विभागात इतर विभागातील कार्यरत सफाई कामगार हजर न झाल्याबद्दल त्यांचेवर पुढील कारवाई करण्याबाबत प्रस्तावित असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील लोकग्राम पुलाचे नुतनीकरण व रुंदीकरण तसेच लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृह बांधण्याबाबत

**(२९) ११९६२४ (२८-०७-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील लोकग्राम पुल हा अत्यंत जुना व जीर्ण अवस्थेतील असून सदर दुरवस्थेतील पुल कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे स्थानिक नागरिकांनी महानगरपालिकेच्या माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्यामुळे घाणीचे साम्राज्य वाढले असून अत्यंत दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकग्राम पुलाचे नुतनीकरण व रुंदीकरण तसेच लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) • लोकग्राम पादचारी पुल १९९१ मध्ये रेल्वेने बांधला आहे, त्याचा खर्च महानगरपालिकेने रेल्वेला दिला आहे.

• सदर पुलाची देखभाल रेल्वेमार्फत करण्यात येत असून त्याचा खर्च महानगरपालिका अदा करते.

• सदर पुल अरूंद असल्याने वाढत्या प्रवासी संख्येस अपुरा पडतो.

•लोकग्राम पादचारी पुल जीर्ण झाल्याबाबत रेल्वे प्रशासनाकडून तसेच स्थानिक नागरिकांकडून या संदर्भात कोणताही पत्र व्यवहार महानगरपालिकेकडे केलेला नाही.

• एल्फिस्टन रोड येथील पादचारी पुल दुर्घटनेनंतर या पुलाची विशेष समितीने पाहणी केली असून सदर समितीने प्रस्तुत पुलाचे मजबुतीकरण करून त्यावर छत टाकणेबाबत सुचविले आहे.

(२) • लोकग्राम तिकिट घराचे पाठीमागे रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत नाला असून तेथे अस्वच्छता आहे, ही वस्तुस्थिती आहे.

•लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृहाची सोय करण्यासाठी तसेच त्याठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी महानगरपालिकेने रेल्वे प्रशासनास विनंती केली आहे.

(३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत स्मार्ट सिटी योजने अंतर्गत कल्याण पूर्व भागात स्वच्छतागृह, प्रशस्त पादचारी पुल, वाहनतळ, रिक्षा स्टॅण्ड व बसस्थानक इत्यादीबाबी प्रस्तावित करण्यात आल्या असून, सदर प्रस्तावास रेल्वे प्रशासनाची मंजूरी प्रलंबित आहे.

• याच प्रस्तावात लोकग्राम पुलाचे मजबुतीकरणाचा समावेश करण्याची बाब तपासण्याच्या व त्यासह संपूर्ण प्रस्तावास रेल्वे प्रशासनाची मंजुरी घेण्याच्या सूचना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (ता.कल्याण (पूर्व), जि.ठाणे) महानगरपालिकेकडून वसूल करण्यात येणारा वास्तव्य कर रद्द करण्याबाबत**

**(३०) ११९६२५ (२३-०७-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसवली (ता.कल्याण (पूर्व), जि.ठाणे) येथील राधेकृष्ण पार्क हौसिंग सोसायटी व गावातील नागरिकांना एम.आय.डी.सी. मार्फत पाणीपुरवठा केला जात असतांनाही महानगरपालिकेमार्फत वीज, पाणी, रस्ते यापैकी कोणतीही सोयी-सुविधा पुरवित नसतांनाही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून सदर रहिवाश्यांकडून वास्तव्य कर वसूल करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पिसवली गावातील नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असून नागरिकांनी महानगरपालिकेने आकारलेले कर रद्द करुन आकारण्यात आलेली रक्कम नागरिकांना परत देण्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) पिसवली गावातील राधेकृष्ण पार्क सोसायटीकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा केला जातो, तर वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य वीज कंपनीकडून केला जातो.

• या गावातील रस्ते महापालिकेमार्फत विकसित करण्यात येत आहेत.

• २७ गावांमधील पिसवली गांव हे दि. ०१ जून, २०१५ पासून महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्याने तेथील कर वसुली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे तेथील नागरिक व लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे.

(३) २७ गावांची कर आकारणी कमी करण्याबाबत दि.१९.०४.२०१८ रोजी महापालिका सर्वसाधारण सभेने महानगरपालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व करांच्या २०% प्रमाणे कर आकारणी करून दुरूस्तीची बिले निर्गमित करण्याबाबत ठराव क्र. १२ पारीत केलेला आहे.

• तथापि सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अ मधील तरतूदीच्या विसंगत असल्याने त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

• सदर ठराव विखंडनासाठी शासनास प्राप्त झाला असून त्यावर पुढील नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पूर्व (जि.ठाणे) नेतिवली परिसरात राहत असलेल्या आदिवासींच्या झोपड्यांवर महानगरपालिकेने कारवाई केल्याबाबत**

**(३१) ११९९०४ (२८-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पूर्व (जि.ठाणे) नेतिवली परिसरात गत अनेक वर्षापासून राहत असलेल्या आदिवासींच्या झोपड्यांवर महानगरपालिकेने कारवाई केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचा विरोध करत आदिवासी कुटुंबांनी महानगरपालिका कार्यालयावर मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३५ वर्षापासून १४ आदिवासी कुटुंबे या ठिकाणी राहत असून शासकीय नियमानुसार त्या जागेची कागदपत्रे त्यांच्या नावे आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कागदपत्रे असतानाही या आदिवासींच्या घरांवर कारवाई करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • मे. सोलार केम्फर्टस प्रा.लि. यांनी सर्व्हे नं. ४ब/२ या ठिकाणी असलेल्या अनधिकृत झोपड्या हटविणेबाबत दि.१८.०५.२०१२, दि. २३.०८.२०१३, दि. २५.०३.२०१४ रोजी महानगरपालिकेस अर्ज सादर केला होता.

• याअनुषंगाने तत्कालीन सर्व्हेअर यांनी दि. २५.०३.२०१४ अन्वये पाहणी अहवाल सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने कलम २६० नुसार तत्कालीन प्रभागक्षेत्र अधिकारी यांनी एकूण ६ झोपडीधारकांना नोटीस दिल्या.

•बांधकाम अधिकृततेबाबत दि. ३०.०५.२०१४ रोजी घेतलेल्या सुनावणीत संबंधीत झोपडीधारक त्यांच्या मालकी हक्काबाबतची कोणतीही कागदपत्रे सादर करू न शकल्याने सदर बांधकाम अनधिकृत घोषित करण्यात आले.

•सदर अनधिकृते बांधकामे यापुर्वी मागणी करूनही पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने निष्कासित करता आले नाही.

• दि. ११.०५.२०१८ रोजी पोलीस बंदोबस्त उपलब्ध झाल्याने सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली.

• मे. सोलार केम्फर्टस प्रा. लि. मालक श्रीमती रिना मंगलीक विकासक श्री. नरेंद्र पाठक यांना सदर आदिवासी कुटूंबांचे पुनर्वसन करण्याचे संपूर्ण जबाबदारी असलेबाबतचे पत्र महानगरपालिकेकडून देण्यात आले आहे.

•तथापि, श्रमजीवी संघटना यांचा दि. २२.०५.२०१८ पुनर्वसनाबाबत काढण्यात आलेल्या मोर्चाच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून महानगरपालिकेच्या स्वर्गीय मीनाताई ठाकरे सभागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी व्यवस्था करणेत आलेली आहे. याठिकाणी सदर झोपडीधारक तात्पुरते स्वरूपात राहणेस गेलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेंतर्गत चिकनघर येथील दर्शना या विकासकाने केलेले अनधिकृत बांधकाम

**(३२) १२०२६८ (२९-०७-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत स.नं.८३/६,मौजे-चिकनघर येथील श्रीमुरलीधर को.ऑप.हौ. सोसायटी, लि.च्या दर्शना विकासकाने सदर सोसायटीअंतर्गत मंजूर आराखडयाव्यतिरिक्त अनधिकृत कार्यालय व सदनिकेचे बांधकाम केल्याबाबत सोसायटीने दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुषंगाने दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास महानगरपालिकेने केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या पाहणीनुसार सदर बांधकाम अनधिकृत असल्याचे सिध्द झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकासकास सुनावणीस हजर रहाण्याचे नोटीस देवूनही विकासक सुनावणीस हजर न राहिल्यामुळे महानगरपालिकेने विकासकास अनधिकृत बांधकाम स्वखर्चाने निष्कासित करण्याचे आदेश देवूनही विकासकाने अनधिकृत बांधकाम निष्कासित केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत बांधकाम निष्कासित न झाल्यामुळे सोसायटीने उक्त बांधकाम निष्कासित करण्यासाठी महानगरपालिकेकडे सातत्याने तक्रार अर्ज देवूनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरचे बांधकाम अनधिकृत असल्याचे सिध्द होवूनही निष्कासित न करणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) • कल्याण (प.) येथील दर्शना बिल्डींगजवळ अंदाजे ३.५० X ४ मी. चे तळमजल्यावर ऑफिस व ८.०० X २.५० मी. चे बांधकाम केल्याची तक्रार दि. १८.०३.२०१६ रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाली होती.
• सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. २२.०३.२०१६ रोजी पाहणी करून संबंधितांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-२६० अन्वये नोटीस देऊन दि. ०२.०५.२०१६ रोजी सुनावणीस बोलविण्यात आले होते.
• परंतु सदर सुनावणीस बांधकामधारक हजर राहिले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम- ४७८ अन्वये सदर बांधकाम अनधिकृत घोषित करण्यात येऊन, विहीत मुदतीत सदर बांधकाम स्वत: निष्कासित करण्याबाबत बांधकामधारकास आदेशित करण्यात आले.
• तथापि, दि. २३.०७.२०१७ रोजीच्या तात्काळ बांधकाम निष्कासित करण्याच्या पत्रास अनुसरून बांधकामधारकाने दि.०३.०८.२०१७ रोजी केलेल्या खुलाश्यात सदरचे दुकान गाळे हे इमारतीचा नकाशा मंजूर होण्या आधीपासूनचे असल्याने व त्याचा अनिवासी टॅक्स भरत असल्याबाबत नमूद करून सोबत नकाशा, गाळ्याच्या जुन्या टॅक्स पावत्या, अनिवासी टॅक्स पावत्या संलग्नीत केल्या.
• त्यामुळे उक्त बांधकामाच्या अधिकृततेबाबत नगररचना विभागाकडून तपासणी करून घेण्यात येत आहे व त्यानुसार कायदेशीर बाबींची विहीत प्रक्रिया पूर्ण करून सदर बांधकाम निष्कासित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझगाव (मुंबइ) येथील म्हातार पाखाडी रस्ता येथील 'तांबावाला बिल्डिंग' या उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत**

**(३३) १२०६५१ (२३-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माझगाव (मुंबई) म्हातार पाखाडी रोड येथील, सी.एस.क्र. ५२५, ई-६४८२ (१सी) आणि इमारत क्र. १२ ए -३२ बी 'तांबावाला बिल्डिंग' या उपकर प्राप्त इमारतीच्या डि.सी.रूल ३३ (७) अन्वये पुनर्विकास प्रकल्पात विकासकास सन २००९ मध्ये म्हाडाने मंजूर केलेले ना हरकत प्रमाणपत्र दिनांक ०३ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास म्हाडाने रद्द केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात रहिवाशांना योजनेची माहिती न देता सक्तीने संमतीपत्रावर सहया घेतल्या प्रकरणी सुमारे ४४ रहिवाशी कुटुंबांनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दु व पु मंडळ म्हाडा यांना मुंद्राकिंत स्टॅम्प पेपरवर नोटरी करून सादर केली असतानाही म्हाडाचे मुख्य अधिकारी यांनी पुन्हा नव्याने रहिवाशांच्या सन २००९ च्या जुन्या संमतीपत्राच्या आधारे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पुन्हा ना हरकत प्रमाणपत्रास बेकायदा मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ९ वर्षात संमती पत्र घेवून विकासकांनी कोणतेही बांधकाम केले नसताना ४४ रहिवाशांनी संमतीपत्र रद्द करण्याचे दिलेले पत्र तसेच प्रकल्पातील त्रुटीचे २० आक्षेपार्ह मुद्याच्या पत्रावर कोणतेही उत्तर न देता रहिवाशांना अंधारात ठेवून प्रकल्पास ७० टक्के मान्यता नसताना म्हाडाने पुन्हा नव्याने ना हरकत प्रमाणपत्र मंजूर करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने उच्च स्तरावरून चौकशी करून प्रकल्पाची मान्यता त्वरीत रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

वि.नि.नि. ३३(७) नुसार उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता किमान ७० टक्के भाडेकरु / रहिवाश्यांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे प्राप्त झाल्यानंतर, मंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते व अशी एकदा दिलेली अपरिवर्तनीय संमतीपत्रे परत घेवून रद्द करण्याची तरतुद सदर वि.नि.नि. ३३(७) मध्ये अंतर्भुत नाही. तसेच अन्य एका प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने एकदा दिलेली अपरिवर्तनीय संमतीपत्रे परत घेण्याबाबतची याचिकाकर्त्यांची विनंती याचिका क्र.(L) १०/२०१० व ८५१/२०१० यामध्ये फेटाळून लावली आहे. त्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने सुमारे ४४ भाडेकरू / रहिवाशी यांनी मुद्रांकित स्टॅम्प पेपरवर संमतीपत्रे रद्द करत असल्याची विनंती मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून विचारात घेण्यात आलेली नाही.
(३) सदर प्रकल्पास असहकार्य करणाऱ्या काही भाडेकरु / रहिवाशी यांनी दिलेल्या २० आक्षेपार्ह मुद्दांबाबत त्यांची संयुक्त सुनावणी तत्कालीन मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांनी दि.१०.०४.२०१८ रोजी घेतली. असहकार्य करणाऱ्या भाडेकरु / रहिवाशी यांचे निवेदन, विकासकांचे निवेदन व तसेच उक्त प्रकल्पास सहकार्य व संमतीपत्र दिलेल्या रहिवाश्यांचे निवेदन, इत्यादी बाबीं विचारात घेवून, तत्कालीन मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांनी दि.१०.०५.२०१८ रोजी सविस्तर आदेश पारित केले. सदर आदेशाची प्रत असहकार्य करणाऱ्या प्रत्येक भाडेकरु/रहिवाश्यांस देण्यात आली असून आदेशामध्ये ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत, तसेच त्यास मुदतवाढ देण्याबाबतची कारणे नमुद केलेली आहेत.
(४) व (५) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

**नाशिक महानगरपालिका बुस्टर पंपींग स्टेशनरील कामगारांच्या पद निर्मितीस मंजुरी मिळणेबाबत**

**(३४) १२०६६४ (२५-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या विविध पंपींग स्टेशनवर देखभाल व दुरुस्तीकरीता सन २००६ पासून ते आजतागायत एकुण ४७ कर्मचारी हे कार्यरत असून या कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाव्दारे दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४७ कर्मचा-यांच्या पदनिर्मितीबाबतचा प्रस्ताव देखील शासनाकडे मंजुरी कामी महानगरपालिकेच्या वतीने सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे काय किंवा देण्यात येणार काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) वित्त विभागाचे दिनांक २७/९/२०१० चे परिपत्रक व सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २५/०८/२००५ च्या परिपत्रकातील निर्देशानुसार, सदरच्या ४७ कर्मचाऱ्यांना नियमित आस्थापनेवर कायम करता येणार नाही. त्यानुसार महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये सदर पदांची आवश्यकता राहणार नाही, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेमार्फत देवळाली गावात बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेतील इमारतीचा स्लॅब कोसळल्याबाबत**

**(३५) १२१२६१ (२९-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या देवळाली गावातील घरकुल योजनेतील इमारतीचा स्लॅब कोसळला असल्याने घरकुल योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने तीन महिन्यापूर्वी गवळीवाडा आणि वडारवाडीतील झोपड्या हटवून तेथील लोकांना गावातील घरकुल योजनेतील गांधीधाम इमारतीत फ्लॅट दिले आहेत व सदर इमारतीत ८० फ्लॅट असून इमारतीत नव्यानेच राहण्यास आलेल्या लाभधारकांच्या फ्लॅटचा स्लॅब कोसळला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निकृष्ट बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) • जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजनेंतर्गत नाशिक महानगरपालिकेने 'शहरी गरीबांसाठी घरकुल योजना' राबविली आहे.
• याअंतर्गत देवळाली गाव गांधीधाम या ठिकाणी नाशिक महानगरपालिकेमार्फत प्रत्येकी ८० सदनिकांच्या दोन इमारती, असे एकूण १६० सदनिकांचे बांधकाम करण्यात आले आहे.
• उपरोक्त दोन्ही इमारतींपैकी कुठल्याही इमारतीचा स्लॅब कोसळलेला नाही.
• तथापि, वरील १६० सदनिकांपैकी एका सदनिकेच्या हॉल मधील छताचे २ X ३ फुटाचे प्लास्टर पडले होते. त्याची ठेकेदारामार्फत त्वरीत दुरुस्ती करण्यात आली आहे.
• स्लॅब कोसळण्याची घटना घडलेली नसल्याने बांधकामाची चौकशी करण्याचा व संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगाली व कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपरिषदेतील कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत**

**(३६) १२१८५९ (२६-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगाली व कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपरिषदेतील कर्मचा-यांनी त्यांच्या विविध मागण्यांकरीता दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील नगरपरिषदेच्या कर्मचा-यांच्या मागण्यांचा आढावा घेऊन त्या पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हिंगोली व कळमनुरी नगरपरिषदेमध्ये दि.०५.०५.२०१८ रोजी कर्मचारी संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये आंदोलनाचा पहिला टप्पा दि.०७ मे, २०१८ रोजी दुपारी २.०० ते ३.०० या वेळेत धरणे आंदोलन करण्यात येईल, असे नमूद आहे. परंतू सदर कालावधीत नगरपरिषद हिंगोली व कळमनुरी या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आलेले नसल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(२) सदर निवेदनात नगरपरिषद सफाई कामगारांना सदनिका उपलब्ध करुन द्याव्यात म्हणून मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार नगरपरिषद हिंगोली व कळमनुरी मार्फत पंतप्रधान

आवास योजना व रमाई घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. निवेदनातील नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा आढावा घेऊन त्या पुर्ण करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना कळविण्यात आले आहे. तसेच निवेदनातील शासन स्तरावरील मागण्या तपासण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रावेर (जि.जळगांव) नगरपालिकेची हद्दवाढ करणेबाबत

**(३७) १२२३७२ (२५-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील रावेर नगरपालिकेची हद्दवाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रावेर नगरपालिकेची हद्दवाढ करणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी जळगाव यांच्याकडून रावेर नगरपालिकेची हद्दवाढ करण्याबाबत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहिती मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औरंगाबाद येथील नारेगाव (मांडकी) येथील कचरा डेपो विरोधात नागरिकांनी केलेले आंदोलन

**(३८) १२२३८८ (२५-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील नारेगाव (मांडकी) येथील कचरा डेपो विरोधात तेथील १५ गावांतील नागरिकांनी आंदोलन केले असल्याचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शासनाने येथील कचरा डेपो अन्यत्र हलविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) औरंगाबाद शहरातील कचऱ्याचे घरोघरी जावून १०० टक्के कचरा संकलन करून त्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करण्यात येत आहे. ओल्या कचऱ्यावर विकेंद्रित पध्दतीने प्रक्रिया करण्यात येत असून सुका कचरा पुनप्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेल्या समितीने कायम स्वरूपात चिकलठाणा (दुग्धनगरी), हर्सुल-सांगवी, पडेगाव (कत्तलखाना जवळ), कांचनवाडी इ. जागा निश्चित केलेल्या असुन या चार ठिकाणी घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे महानगरपालिकाचे नियोजन आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत औरंगाबाद शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा रूपये ९१.७९ कोटी किंमतीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यतेसह निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (पुर्व) क्षेत्रातील विठ्ठलवाडी उड्डाणपुलाजवळील तलावाच्या प्रदूषणाबाबत**

**(३९) १२३१०४ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (पुर्व) क्षेत्रातील विठ्ठलवाडी उड्डाण पुलाजवळील तलावात टाकलेल्या कचऱ्यामुळे व निर्माल्यामुळे उक्त तलावातील पाणी दुषित झाल्याने परिसरामध्ये दुर्गंधी पसरून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त तलावाची स्वच्छता व कारंजे पुनर्जिवित करण्याबाबत कल्याण-डोंबिवली प्रशासनास कळविले असून याबाबत प्रशासन टाळाटाळ करित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाकडून महानगरपालिका प्रशासनास कोणते तातडीचे आदेश देण्यात आले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) • कल्याण पूर्व विठ्ठलमंदिर तलावासभोवती इमारती असून, सदर तलावामध्ये नागरिकांकडून वारंवार निर्माल्य व कचरा टाकण्यात येतो. त्यामुळे तलावाच्या पाण्यावर शेवाळ व पानवनस्पती येऊन सदर तलाव अस्वच्छ होतो, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) • महानगरपालिकेने सन २०१४ पासून ५ वेळा तलावातील कचरा काढून तलाव स्वच्छ केलेला आहे.
•सदर तलाव परिसरातील नागरिकांची तलावामध्ये कचरा टाकण्याची मानसिकता बदलणे व कचरा टाकणेस प्रतिबंध करणेसाठी तलावामधील पाण्याच्या संवर्धनाकरीता कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे, तलावामध्ये नौका विहार करणे, मासेमारी करणे, तलावासभोवती जाहिरात

करणे. तसेच तलावाच्या एका बाजूस कॅफेटेरिया चालविणे या सर्व बाबीमधून येणाऱ्या उत्पनामधून तलावाचे जतन करण्यासाठी पी.पी.पी. तत्वानुसार देकार मागवून तलावाची देखभाल व दुरूस्ती दैनंदिनरित्या होण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त पदी बेकायदेशीर पदोन्नती दिल्याबाबत

**(४०) १२३३९८ (३०-०७-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत शासनामार्फत तत्कालीन उपायुक्त श्री.संजय घरत यांना दिनांक ७ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास अतिरिक्त आयुक्त पदी पदोन्नती देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदोन्नती देतांना महासभेची मान्यता घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.संजय घरत यांची सेवा शासनाकडे वर्ग करणे बंधनकारक असतांनाही ते अजूनही महानगरपलिकेचे स्थानिक अधिकारीच आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्री.घरत यांनी अतिरिक्त आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यापासून महापालिका क्षेत्रात सुमारे २०,००० हून अधिक अनधिकृत बांधकामांना सरक्षण देवून शासनाच्या कोट्यवधी रूपयांचा महसूल बुडविला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) • शासन निर्णय दि. ०६.०१.२०१५ मधील विहीत कार्यपध्दती अनुसरून श्री. संजय घरत, उपायुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांची अतिरिक्त आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका या पदावर दि. ०२.०६.२०१५ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) श्री.संजय घरत हे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थानिक अधिकारी आहेत. त्यांची सेवा शासनाकडे वर्ग करण्यात आलेली नाही.
(४) • दि. ०२.०३.२००९ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आणि महानगरपालिकेने विहीत केलेल्या कार्यप्रणाली नुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येते.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात माहे जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१७ या कालावधीत एकूण ५६२१ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली असून १० अनधिकृत बांधकाम धारकांविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

• सदर निष्कासन कारवाईसाठी झालेल्या खर्चापोटी रू.१,९६,५५०/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार बोळिंज (जि.पालघर) येथील म्हाडाची घरे सोडतीमधील विजेत्यांनी परत केली असल्याबाबत**

**(४१) १२३५८५ (२३-०७-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडा कोकण मंडळाच्या सन २०१४ व सन २०१६ मधील सोडतीतील सुमारे ४ हजार ४०० घरांपैकी १ हजार ९०० घरे म्हाडाला परत केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरमयान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाच्या घरांच्या वाढीव किमतींमुळे आणि म्हाडामार्फत प्रक्रिया करण्यास होणाऱ्या विलंबामुळे ही घरे परत केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाच्या १ बीएचके सदनिकेची किंमत जवळपास २३ लाख रुपये असून मोठ्या घरांची किंमत ४० लाख एवढी आहे, मात्र म्हाडाच्या किमतींच्या तुलनेत खुल्या बाजारात कमी किंमतीत लोकांना घरे उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व म्हाडाच्या सदनिकांना ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने तसेच गरीब व गरजू लोकांना म्हाडाची घरे मुबलक दरात उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

म्हाडाने विरार बोळींज गृहप्रकल्पामध्ये एकूण ५४४६ (सन २०१४ व २०१६ मधील) सदनिकांची जाहीरात दिलेली होती. त्यापैकी २४६ अर्जदारांनी स्वत:हून परतावा घेतलेला आहे.
(२) नाही.
(३) विरार बोळींज येथे सध्या बाजारभाव रु.८७३०/- ते ८९८६/- प्रति चौ.फुट (चटई क्षेत्रफळावर) इतका आहे व म्हाडाचे दर रु.७२१४/- प्रति चौ.फुट (चटई क्षेत्रफळावर) आहे.

तसेच रेडी रेकनर नुसार दर रु.४९३३/- प्रति चौ.फुट (बांधकाम क्षेत्रफळावर) व म्हाडाचा दर रु.३८०९/- प्रति चौ.फुट (बांधकाम क्षेत्रफळावर) इतका आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली नगरपरिषदेकडे (जि.हिंगोली) केवळ एकच अग्निशमन वाहन उपलब्ध असल्याबाबत**

**(४२) १२४४३७ (३०-०७-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या असून हिंगोली नगरपरिषद यांच्याकडे केवळ एकच अग्निशमन वाहन उपलब्ध असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली शहरामध्ये एप्रिल ते मे महिन्या दरम्यान २० ते २२ आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक अग्निशमन वाहन सहा महिन्यांपासून नादुरुस्त असल्यामुळे भंगारात जमा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोंदीनुसार हिंगोली शहरामध्ये माहे एप्रिल, २०१८ मध्ये १२ व मे, २०१८ मध्ये १८ अशा एकूण ३० आगीच्या घटना घडलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

हिंगोली नगरपरिषदेकडे दोन अग्निशमन वाहने होती. त्यापैकी एक वाहन चालू स्थितीत आहे, तर दुसरे वाहन कायमस्वरुपी बंद असल्यामुळे रितसर प्रक्रिया करुन लिलावाद्वारे विक्री करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र राज्य अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत दि.२६.०२.२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार हिंगोली नगरपरिषदेने Quick Response Vehicle हे water mist fire fighting system चे अद्ययावत असे दुसरे अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी दि.०८.०३.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले. त्यानुसार दि.०५.०६.२०१८ रोजी सदर नविन अद्ययवात तंत्रज्ञानयुक्त असे अग्निशमन वाहन हिंगोली नगरपरिषदेच्या अग्निशमन दलामध्ये दाखल झाले आहे. सद्यस्थितीत हिंगोली नगरपरिषदेकडे २ अग्निशमन वाहने कार्यरत असल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर शहरातील गांधळीपुरा भागात बालकाचा खड्यात पडून झालेला मृत्यू**

**(४३) १२४५०० (३०-०७-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर शहरातील गांधळीपुरा भागात दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास रस्त्याच्या कामाकरीता खोदलेल्या खड्यात पडून बालकाचा मृत्यू झाल्यामुळे मृत्यूस जबाबदार नगरपालिका व ठेकेदार यांच्यावर सखोल चौकशीव्दारे कारवाई करुन पीडित कुटूंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी अमळनेर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्यमंत्री, नगरविकास यांनी दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.राज्यमंत्री, नगरविकास यांनी संबंधित विभागास कार्यवाहीचे आदेशही दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई करुन पीडित कुटूंबियांना नुकसान भरपाई मिळणेबाबत संबंधित विभागामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त झाला असून, सदर अहवालात बालकाचा मृत्यू त्याच्या वडीलांनी खोदलेल्या सांडपाण्याच्या खड्ड्यात झाला आहे. याबाबत मयत बालकाच्या वडिलांनी नगरपरिषदेस निवेदन दिले असून, अमळनेर नगरपरिषद किंवा रस्ता बांधकामाचा कोणताही संबंध नाही. तसेच त्यांच्या समाजाच्या कोणत्याही नेत्यांनी विचारपूस न करता, नगरपरिषद किंवा कंत्राटदार यांच्याविरुद्ध निवेदन दिलेले आहे. सदर निवेदन बालकाच्या वडिलांना मान्य व कबूल नाही. सदरचा खड्डा नगरपरिषद किंवा कंत्राटदार यांनी केलेला नव्हता. तसेच अमळनेर नगरपरिषद व कंत्राटदाराविरुद्ध कोणतीही तक्रार नसल्याचे निवेदन मुख्याधिकारी, अमळनेर नगरपरिषद यांना दि.२३.०३.२०१८ रोजी दिले असल्याबाबत जिल्हाधिकारी, जळगांव यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार नगरपरिषदेकडून रस्त्याची कामे करतांना गुणवत्ता राखली जात नसल्याबाबत

**(४४) १२४५०३ (३०-०७-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार नगरपरिषदेकडून निवडणूकीपूर्वी रस्त्याची कामे करतांना गुणवत्ता व दर्जा राखला जात नसून कामाची गुणवत्ता तपासून देयक अदा करणेबाबत नंदुरबार शळरातील एका राजकिय पक्षाच्या नेत्याने नगरविकास विभागाकडे तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सविस्तर गुणवत्ता तपासणी अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या शासनाच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांना कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांनी शासनाकडे अहवाल सादर केला आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत दि.१८.११.२०१७ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. याबाबत उपजिल्हाधिकारी (प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदूरबार यांच्या दि.२८.११.२०१७ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदूरबार यांना सदर तक्रारीच्या अनुषंगाने व प्रामुख्याने मुद्देनिहाय १ ते १३ कामाच्या जागेवर स्थळनिरिक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले.
(३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या दि.२६.०६.२०१८ च्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला असून शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावदा नगरपरिषदेच्या (जि.जळगांव) हद्दवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(४५) १२४५३३ (३०-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावदा नगरपरिषदेच्या परिसरातील नागरीकांना विविध सोयीसुविधा पुरविण्याबाबत नगरपरिषदेकडे लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत आहे म्हणून सावदा नगरपरिषदेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मार्च, २०१८ व दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव (नगरविकास) यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी जळगाव यांच्याकडून सावदा नगरपालिकेची हद्दवाढ करण्याबाबत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहिती मागविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील ओला व सुका कचरा विलगीकरणाबाबत**

**(४६) १२५०२४ (३०-०७-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेकडून ओला आणि सुका कचरा वेगळा करण्याचा संकल्प केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचे कर्मचारी नागरीकांनी वेगळा केलेला कचरा पुन्हा एकत्रित करुन आधारवाडी डम्पिंगवरच फेकत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते श्री.श्रीनिवास घाणेकर यांनी सोशल मीडियावर फोटोच्या माध्यमातून माहे मे, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी सादर केल्यानुसार माहनगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत दररोज निर्माण होणाऱ्या ६५० मे. टनांपैकी ११० मे. टन सुका कचऱ्याचे विलगिकरण करण्यात येत असून सदर सुका कचऱ्यावर स्वतंत्ररित्या प्रक्रिया करण्यात येते.

• तसेच ३० मे. टन ओला कचऱ्यावर बायोगॅस प्रकल्प उंबर्डे व आयरे गाव, गृहनिर्माण संस्था, मंदिर व बाग बगिचे येथे खत निर्मिती करण्यात येते.

• ओला व सुका कचरा वेगळा करण्यात आल्यानंतर तो पुन्हा एकत्रित करून आधारवाडी डंपींगवर टाकण्यात येत नसून, वेगळा करण्यात आलेल्या कचऱ्यावर स्वंतत्ररित्या प्रक्रिया करण्यात येत असून, तो कचरा पुन्हा एकत्रित केला जात नाही.

• मौजे उंबर्डे ३५० मे. टन एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास पर्यावरण विभागाचा दि.०८.०६.२०१८ रोजी ना-हरकत दाखला प्राप्त झाला असून सदर प्रकल्पास सुरूवात केली असता स्थानिक ग्रामस्थांनी त्यास विरोध केला.

• मौजे बारावे येथील प्रकल्पाच्या पर्यावरण ना-हरकत दाखल्यास राष्ट्रीय हरित लवादा पुणे अपिल क्र. ५२/२०१८ दाखल असून त्यास स्थगिती प्राप्त झाली आहे.

• मौजे उंबर्डे, बारावे व माडा येथील प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर विलगिकरण केलेल्या कचऱ्यापासून खत निर्मिती तयार करण्याचे प्रस्तावित असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवाजीपार्क (मुंबई) येथील इमारतींच्या पुनर्विकासात विकासकाने रहिवाश्यांची केलेली फसवणूक

**(४७) १२५०६४ (२३-०७-२०१८). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम मतदार संघातील शिवाजीपार्क (मुंबई) येथील अहमद बिल्डींग, मोहम्मदी मंजिल, समाधान, लाहेर चेम्बर, सिध्दपुरा या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता विकासकाला म्हाडाकडून दिनांक १८ जून, २०११ ला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ७-८ वर्षा पासून विकासकाने इमारतीचे काम प्रलंबित ठेवले असून ४ वर्षापासून तात्पुरत्या स्थलांतरासाठीचे भाडेही वेळेवर देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतींच्या प्रलंबित असलेल्या पुनर्विकासामुळे रहिवाश्यांचे हाल होत असून स्थानिक लोकप्रतीनिधिंनी ही बाब वेळोवेळी म्हाडा तसेच शासनाच्या निदर्शनास आणून देऊनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतींचा पुनर्विकास विकासकांकडून होत नसल्याने शासन सदर विकसकांना काळ्या यादीत टाकून स्वतः प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेणार आहे काय,

(५) असल्यास, या इमारतींच्या पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने सदर विकासकांच्या अन्य मालमता सील करण्याची कारवाई शासनाकडून करण्याबाबत तसेच येथील विक्री इमारतीतून वसुली सापेक्ष शासनाकडून रहिवाशांच्या भाड्याची रक्कम देण्याबाबत कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर इमारतींच्या पुनर्विकासाच्या बांधकामात काही तांत्रिक कारणांमुळे अडचणी निर्माण झाल्यामुळे काम थांबविण्यात आले होते. इमारतीच्या आराखड्यात व फाऊंडेशनच्या डिझाईनमध्ये बदल करणे आवश्यक होते. सद्य:स्थितीत पुनर्वसन इमारतीचे जोत्याचे काम सुरु आहे.

विकासकांने सन २०१० नंतर भाडेकरु / रहिवाश्यांना तात्पुरत्या पर्यायी जागेसाठी भाडे अदा केलेले आहे. परंतु अंदाजे गेले एक ते दीड वर्षापासून भाडेकरु / रहिवाश्यांचे भाडे प्रलंबित असल्याचे मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने कळविले आहे.

(३) याबाबत उपरोक्त नमुद केलेल्या अडचणीमुळे पुनर्विकासाचे काम रखडले होते व त्यामुळे रहिवाश्यांचे पुनर्वसन वेळेत होऊ शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळावेळी मंडळास पत्राव्दारे निदर्शनास आणून दिले आहे. सद्य:स्थितीत पुनर्वसन इमारतीचे ज्योत्याचे काम विकासकांने सुरु केले आहे. परंतू सदर मालमत्तेच्या समोरच मुंबई मेट्रोचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे, पुनर्विकासाचे काम धिम्या गतीने सुरु आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिके क्षेत्रातील आरक्षीत भुखंडाबाबत

**(४८) १२६३३१ (०२-०८-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या कृती विकास आराखडयास सन २००६ मध्ये मान्यता देण्यात आलेली असतांनासुध्दा महानगरपालिका क्षेत्रामधील कल्याण पुर्वेतील लोकउपयोगी आरक्षणे महानगरपालिका प्रशासन ताब्यात घेवु शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरक्षीत भुखंड वाचविण्याकरीता वारंवार मागणी करूनसुध्दा महानगरपालिका प्रशासनामार्फत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने आरक्षित भुखंड ताब्यात घेण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्र.१ व २ च्या विकास योजनेस दि.१४/०९/२००९ तर सेक्टर क्र. ३ ते ७ च्या विकास योजनेस दि.०४/०८/२०१६ रोजी अंतिम मंजूरी प्रदान केलेली आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कल्याण पूर्व विभागातील १५६ आरक्षण क्षेत्रांपैकी एकूण ७६ आरक्षण क्षेत्रे ताब्यात घेतली आहेत.

• उर्वरीत आरक्षण क्षेत्र ताब्यात घेण्यासाठीची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या परवानाधारक अंपगांचे स्टॉल व गटई कामगार यांचे पुनर्वसनाबाबत

**(४९) १२६३३४ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेले परवानाधारक अंपग स्टॉल व गटई कामगार यांचे पुर्नवसन करण्याकरिता वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधींकडुन मागणी होत आहे तसेच महानगरपालिकेमध्ये असंख्य अपंगांनी नविन स्टॉलसाठीचा परवाना मिळण्याकरिता अर्ज दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंगाच्या पुर्नवसनाबाबत व अपंगाना नविन स्टॉल परवाना देणेबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सद्या १६२ अंध/अपंग स्टॉल, तर ३१७ गटई स्टॉल मंजूर केलेले आहेत.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अपंगाच्या पुनर्वसनाबाबत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणेत असून, महिला व बालकल्याण दिव्यांग समितीचे पटलावर याबाबत गोषवारा पाठविण्यात आला आहे.

• त्याअनुषंगाने नवीन अपंग स्टॉलसाठी आलेल्या अर्जानुसार प्रतिक्षा यादी तयार करणेची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असून याबाबतचे धोरण निश्चित झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांमधील पाणी समस्येबाबत

**(५०) १२६३४२ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांमध्ये स्थानिक रहिवाश्यांना पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७ गावांतील रहिवाशांना सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक प्रशासनाकडे व शासनाकडे वारंवार मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) • दि. ०१ जून, २०१५ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये २७ गावांचा समावेश करण्यात आला. याभागामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेल्या विविध नळ जोडण्यांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

• सदर २७ गावांकरीता सद्यस्थितीत ६० द.ल.ली. प्रतिदिन इतका पाणी पुरवठा आवश्यक असून प्रत्यक्षात ४५ ते ४८ द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

• २७ गावातील झपाट्याने वाढत असलेल्या नागरीकरणामुळे पाणी पुरवठा कमी पडत असल्याने आवश्यकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा करण्यात येते.

(३) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट नव्याने समाविष्ट झालेल्या २७ गावांसाठी रू.१८०.८१ कोटी किंतीची पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे.

• सदर योजनेमध्ये २१ कि.मी. उर्ध्ववाहिनी, १७ कि. मी. लांबीची गुरूत्ववाहिनी, २८ जलकुंभ व २२३ कि. मी. वितरण व्यवस्थेचा प्रामुख्याने समावेश आहे.

• सदर प्रकल्पाची निविदा अंतिम टप्प्यामध्ये आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.